कुशल महाराष्ट्र रोजगारयुक्त महाराष्ट्र

महाराष्ट्र शासन

## कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभाग
## व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय
### राज्य प्रशिक्षणार्थी सल्लागार

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई – ४०० ००१.

# शिकाऊ उमेदवारी योजनेअंतर्गत विविध व्यवसायात, आस्थापनांमध्ये प्रशिक्षणाची सुवर्णसंधी

## शिकाऊ उमेदवारी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना

**शिकाऊ उमेदवारी योजनेची मुख्य वैशिष्ट्ये व कौशल्यवाढीचे उद्दीष्ट**

- शिकाऊ उमेदवारी योजना ही उद्योग आणि शिक्षण व प्रशिक्षण यामध्ये दुवा आहे.
- त्यांच्या गरजेनुसार विविध व्यवसायांमध्ये कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी शिकाऊ उमेदवारी योजना हे प्रभावी साधन आहे.
- प्रशिक्षणार्थींना तंत्रज्ञान आणि प्रक्रियेतील ताज्या गोष्टी शिकवता येतात व नवीन तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून प्रशिक्षित कर्मचारी कार्यक्षमतेने आणि जलद गतीने काम करू शकतात व त्यामुळे उद्योगांची उत्पादनक्षमता वाढते.
- उद्योगांना प्रशिक्षित उमेदवारांना कायमस्वरूपी कर्मचारी म्हणून सामावून घेता येते. त्यामुळे कुशल मनुष्यबळ भरती करण्यासाठी होणारा खर्च टाळता येतो.
- प्रशिक्षणादरम्यान मिळालेल्या अनुभवामुळे प्रशिक्षणार्थी उद्योगाशी जुळवून घेतात व त्यांच्याशी दृढ संबंध निर्माण होतात, ज्यामुळे ते उद्योगात टिकून राहतात.
- प्रशिक्षणार्थी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्यात जलद असतात त्यामुळे ते नवकल्पनांसाठी योगदान देतात, ज्यामुळे उद्योगाच्या स्पर्धात्मक क्षमतेत सुधारणा होते.
- शिकाऊ उमेदवारीमुळे स्थानिक लोकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करून, सामाजिक विकासात योगदान देऊन उद्योगांची प्रतिमा सुधारण्यास मदत होते, ज्यामुळे उद्योगात सौहार्दपूर्ण वातावरण तयार होते.
- शिकाऊ उमेदवारीमुळे उद्योगांना प्रशिक्षित आणि कुशल मनुष्यबळ तयार करून स्पर्धात्मक फायदा मिळतो आणि त्यांचे कामकाज अधिक कार्यक्षम बनते.
- किमान वय १४ वर्षे. कमाल वय : वयाची कोणतीही अट नाही, परंतु राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी योजनेचा लाभ घ्यावयाचा असल्यास कमाल वयोमर्यादा ३५ वर्षे.
- विद्यावेतन : महाराष्ट्र राज्याने अधिसूचित केलेल्या अर्धकुशल कामगारांच्या किमान वेतनाच्या प्रशिक्षणाच्या प्रथम वर्षात ७०%, दुसऱ्या वर्षात ८०% व तिसऱ्या वर्षात ९०%. दररोज किमान चार तास अर्धवेळ प्रशिक्षण घेणाऱ्या शिकाऊ उमेदवारांना नमूद विद्यावेतनाच्या ५०% इतके असेल.
- निवड : उद्योगाच्या गरजांनुसार उमेदवारांची नोंदणी व निवड Apprenticeship Portal वर ऑनलाइन पद्धतीने कार्यान्वित.
- भारत सरकारच्या राष्ट्रीय शिकाऊ उमेदवार प्रोत्साहन योजना (NAPS) व महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र शिकाऊ उमेदवार प्रोत्साहन योजना (MAPS) अंतर्गत शिकाऊ उमेदवारी योजनेला मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन दिले जाते.
- राष्ट्रीय शिकाऊ उमेदवार प्रोत्साहन योजना (NAPS) अंतर्गत एकूण रुपये १५००/– व महाराष्ट्र शिकाऊ उमेदवार प्रोत्साहन योजना (MAPS) अंतर्गत एकूण रुपये ३,५००/– असे एकूण रुपये ५,०००/– प्रतिउमेदवार प्रतिमहिना प्रोत्साहनपर DBT द्वारे नामनिर्देशित व ऐच्छिक व्यवसाय अभ्यासक्रमामधील शिकाऊ उमेदवारांना विद्यावेतनाचे वाटप करण्यात येते.

शिकाऊ उमेदवारी अधिनियम १९६१ व शिकाऊ उमेदवार (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम २०१७ अंतर्गत महाराष्ट्र राज्यामध्ये इयत्ता ५ वी उत्तीर्ण, इयत्ता ८ वी उत्तीर्ण, १० वी उत्तीर्ण, १२ वी उत्तीर्ण, पदविका उत्तीर्ण, पदवी व पदव्युत्तर उत्तीर्ण विद्यार्थी तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्था उत्तीर्ण विद्यार्थ्यांना व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय तथा राज्य प्रशिक्षणार्थी सल्लागार, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामार्फत उमेदवारांना रोजगारक्षम बनवून रोजगार मिळविण्यासाठी एकूण २६१ नामनिर्देशित व्यवसाय अभ्यासक्रमांत एकूण ३९ व्यवसाय गटांमध्ये व एकूण ७६२ ऐच्छिक व्यवसाय अभ्यासक्रमांत एकूण ३७ व्यवसाय गटांमध्ये प्रशिक्षण घेण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

| अ.क्र. | शिकाऊ उमेदवारीचे प्रकार | व्यवसाय अभ्यासक्रम गट | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| १ | नामनिर्देशित व्यवसाय अभ्यासक्रम (Designated Trade Apprentices) | अभियांत्रिकी उत्पादन, ऑटोमोबाइल, इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स, रासायनिक, बांधकाम, मुद्रण, हॉटेल व कॅटरिंग, रिटेल, आयटी आणि सॉफ्टवेअर, आरोग्य सेवा, पारंपरिक व अपारंपरिक व्यवसाय अभ्यासक्रम, कृषी आणि अन्न प्रक्रिया, नवीन तंत्रज्ञान व सेवा क्षेत्र इत्यादी. | औद्योगिक प्रशिक्षण संस्था उत्तीर्ण,फ्रेशर शिकाऊ उमेदवारीसाठी इयत्ता ८ वी,१० वी, १२ वी व बी.एस्सी. उत्तीर्ण |
| २ | ऐच्छिक व्यवसाय अभ्यासक्रम (Optional Trade Apprentices) | | इयत्ता ५ वीपासून पुढे कोणतीही शैक्षणिक अर्हता. |
| ३ | पदवी अभियांत्रिकी अभ्यासक्रम (Graduate Apprentices) | अभियांत्रिकी पदवी स्तरावरील सर्व अभ्यासक्रम | अभियांत्रिकी पदवी उत्तीर्ण |
| ४ | तंत्रज्ञ (Technicians Apprentices) | अभियांत्रिकी पदविका स्तरावरील सर्व अभ्यासक्रम | अभियांत्रिकी पदविका उत्तीर्ण |
| ४ | व्यवसाय अभ्यासक्रम तंत्रज्ञ (Technicians Vocational Apprentices) | १०+२ स्तरावरील सर्व व्यवसाय अभ्यासक्रम गट | १०+२ व्यवसाय अभ्यासक्रम उत्तीर्ण |

- इच्छुक उमेदवारांनी शिकाऊ उमेदवारीसाठी http://www.apprenticeshipindia.gov.in या केंद्र शासनाच्या पोर्टलवर नोंदणी करावी व अधिक माहितीसाठी त्यांच्या जिल्ह्यांतील संबंधित मूलभूत प्रशिक्षण तथा आनुषंगिक सूचना केंद्र तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्याशी संपर्क साधावा. तसेच वेळोवेळी दिनांक ०१/०१/२०२५ ते दिनांक ३१/०३/२०२५ या कालावधीत संबंधित मूलभूत प्रशिक्षण तथा आनुषंगिक मध्ये आयोजित होणाऱ्या भरती मेळाव्यास उपस्थित राहावे. महाराष्ट्र राज्यातील व्यवसायनिहाय/जिल्हानिहाय आस्थापनांची यादी तसेच भरती मेळाव्याचा कार्यक्रम संचालनालयाच्या www.dvet.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
- महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेचा लाभ घेण्यासाठी ज्या शिकाऊ उमेदवारांनी (Apprentices) दिनांक ०३.०६.२०२१ पासून शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण पूर्ण केले आहे किंवा सद्यस्थितीत शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण करीत आहेत अशा सर्व शिकाऊ उमेदवारांनी https://maps.dvet.gov.in या पोर्टलवर नोंदणी करून महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेंतर्गत दरमहा विद्यावेतन प्राप्त करण्यासाठी अर्ज करावेत. नोंदणी व अर्ज करताना काही तांत्रिक अडचण उद्भवल्यास उमेदवारांनी संबंधित आस्थापनांशी किंवा संबंधित मूलभूत प्रशिक्षण तथा आनुषंगिक सूचना केंद्रांशी संपर्क साधावा. योजनेची सविस्तर माहिती व अर्ज करण्याची सर्वंकष माहिती https://maps.dvet.gov.in या पोर्टलवर देण्यात आलेली आहे.
- सर्व संबंधित आस्थापनांना संचालनालयामार्फत आवाहन करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अखत्यारीतील प्रशिक्षण पूर्ण केलेल्या व करीत असलेल्या शिकाऊ उमेदवारांनी https://maps.dvet.gov.in या पोर्टलवर सादर केलेल्या विद्यावेतनाच्या अर्जाची तपासणी करून मान्यता द्यावी.



स्मॉल इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया व महाराष्ट्र शासन यांनी संयुक्तपणे स्टार्टअपसाठी दोनशे कोटी रुपयांची तरतूद केली आहे. यासाठी प्रत्येक प्रादेशिक विभागाला तीस कोटी रुपयांची तरतूद करणार आहे. काळाची गरज ओळखून स्टार्ट अप धोरणाचा नवीन मसुदा उद्योजकांना सूचनांसाठी देण्यात आला आहे. हे देशातील आधुनिक धोरण ठरणार आहे. राज्यात कुशल मनुष्यबळ विकसित करून रोजगाराच्या अधिकाधिक संधी निर्माण होणार आहेत.

**– देवेंद्र फडणवीस**, मुख्यमंत्री



राज्याच्या कौशल्य विकासाला औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी तसेच शिकाऊ उमेदवारी आणि कार्यप्रशिक्षण अंतर्गत उद्योग आस्थापनांनी मोठी गती दिली आहे.उद्योजकांना त्यांच्या क्षेत्रातील कार्यकुशल मनुष्यबळ तयार केले जावे यासाठी राज्य शासनाकडूनही मोठ्याप्रमाणात प्रयत्न केला जात आहे. राज्य या क्षेत्रात अग्रसर आहे.

**–एकनाथ शिंदे**,उपमुख्यमंत्री



जगासाठी उच्च दर्जाचे कुशल मनुष्यबळ निर्माण करण्याची संधी आपल्या राज्यातील विद्यार्थ्यांना मिळत आहे. शिकाऊ उमेदवारी योजने अंतर्गत महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना ही उद्योग आणि शिक्षण व प्रशिक्षण यामध्ये दुवा तयार करत आहे. उद्योजकांना गरजेनुसार कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी शिकाऊ उमेदवारी योजना प्रभावी ठरेल.

**–अजितदादा पवार**, उपमुख्यमंत्री



रोजगार निर्माण करण्यासाठी कौशल्य विकास विभाग जोरदारपणे काम करत आहे. सर्वाधिक रोजगार निर्माण केले जातील. यासाठी विभागाच्या सर्व योजना प्रभावीपणे राबविल्या जात आहेत. केंद्राच्या राष्ट्रीय शिकाऊ उमेदवार प्रोत्साहन योजना व महाराष्ट्र शिकाऊ उमेदवार प्रोत्साहन योजना अंतर्गत शिकाऊ उमेदवारांना मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन दिले जात असून प्रशिक्षणार्थ्यांना स्वावलंबी होण्यास मदत होत आहे.

**–मंगलप्रभात लोढा**, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री

## संपर्क

Web : http://www.apprenticeshipindia.gov.in; http://www.dvet.gov.in; http://maps.dvet.gov.in

E-mail: desk10@dvet.gov.in; support.apprenticeship@dvet.gov.in